सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कालमर्यादीत

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/3018
दिनांक :- 30/09/2024

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील औषधनिर्माणशास्त्र व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहीती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र. :- २/एनजीसी/Intake App/२०२४/४४० दिनांक ३/७/२०२४.
२.या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०२१/७८८ दिनांक २/७/२०२४.
३.विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०२१/८८० दिनांक १२/७/२०२४.
४. .विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०२१/१०८६ दिनांक ४/९/२०२४.
५. विकाअ/शिक्षण/२०२१/११२९ दिनांक १० ऑगष्ट २०२४.
६. विकाअ/शिक्षण/२०२१/१६३५ दिनांक ५ जुलै २०२४.
७. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २/एनजीसी/औषधनिर्माणशास्त्र/प्रवेशक्षमता/२०२४/७९९ दिनांक २७ सप्टेंबर २०२४.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेची माहीती अचुक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. सदर माहिती आवश्यक कागदपत्रे सादर करुन माहिती अद्ययावत करण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र. २ ते ६ अन्वये आपणास वारंवार कळविण्यात आलेले आहे. तथापी ब-याचश्या संस्थांनी अजुनपर्यंत सदर माहीती अद्ययावत केलेली दिसुन येत नाही.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संदर्भीय पत्र क्र. ७ अन्वये **दिनांक ०१/१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मुदतवाढ दिलेली असल्यामुळे ज्या संस्थांनी माहिती अजूनपर्यंत अद्ययावत केलेली नाही अशा संस्थांनी** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता फार्मसी कॉन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परीषदेची मान्यता, शासन मान्यता व त्यानुसार संबंधीत मंडळाचे सलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच

त्यासोबतची संस्थेची सांख्यिकी माहिती तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांच्या https://approval२४.dtemaharashtra.gov.in या लिंकवर ऑनलाईन पध्दतीने अद्ययावत करुन **दिनांक ०१/१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत** या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहुन कन्फर्म करुन घ्यावे.

ज्या संस्था वरील नमुद दिनांकापर्यंत प्रवेशक्षमतेची माहीती अद्ययावत करणार नाहीत तसेच या कार्यालयाव्दारे प्रमाणित करुन घेणार नाहीत, अश्या संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत केला जाणार नाही, त्यामुळे होणा-या परिणामास सर्वस्वी जबाबदारी सबंधित संस्थेची राहील. याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

**(मनोज म अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर.** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.११९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२ [illegible]
ई-मेल [illegible] वेबसाईट [illegible]

परिपत्रक

क्रमांक : २ /एनजीसी/औषधनिर्माणशास्त्र/प्रवेश क्षमता/२०२४/७९९ दिनांक : 27 SEP 2024

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील साठी औषधनिर्माणशास्त्र व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : १)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/Intake Approval/२०२४/४४०, दि.३.७.२०२४

२)मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा, मुंबई यांचे वेळापत्रक क्र.TED-1224/C.R. No. 06/CAP/M Pharm Admission Notice 5/2024/1681, दि. १९/०९/२०२४

३)मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा, मुंबई यांचे वेळापत्रक क्र.TED-1224/C.R. No. 06/CAP/M Pharm Admission Notice 5/2024/1681, दि.१९/०९/२०२४

४)फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्र.Ref No.14-56/2022-PCI (Approval Process for २०२४-२०२५) Dated-१५.०९.२०२४

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. संस्थाबाबतची औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांचेकडून संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या https://approval24.dtemaharashtra.gov.in या लिंकवर अद्ययावत करुन दि.१९ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. मात्र दरम्यानच्या काळात शिखर परिषदेची मान्यते अभावी ब-याच संस्थांनी माहिती अद्ययावत केले नसल्याचे निदर्शनास आले होते.

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या संदर्भ क्र.४ च्या परिपत्रकान्वये, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिताची मान्यता प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे नमुद केले आहे. तसेच त्यांनी जवळपास सर्व विद्यमान संस्थांची मान्यतेची कार्यवाही पुर्ण केल्याचे देखील नमुद केले आहे. त्याचबरोबर सर्व प्रवेश नियामक प्राधिकरणांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या संस्थांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याची विनंती केलेली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्याद्वारे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अंतिम गुणवत्ता यादी पर्यंतचे वेळापत्रक संदर्भ क्र.२ व ३ अन्वये प्रसिद्ध केले आहे. तसेच कॅपच्या विविध फेरींकरिता विकल्प अर्ज (ऑप्शन फॉर्म) भरणे, कॅप जागा वाटप, जागा स्वीकृती करणे, उमेदवाराने वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे, प्रवेशाची अंतिम तारीख इत्यादींबाबतचे पुढील वेळापत्रक राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्याद्वारे लवकरच प्रसिद्ध करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या सर्व संस्थांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांच्या संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती व प्रवेशक्षमता अद्ययावत करुन दिनांक ०१.१०.२०२४ रोजी सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करावी. तसेच संस्थांनी सादर केलेली माहिती

संबंधित तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाद्वारे पडताळणी व प्रमाणित करुन घ्यावी. तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाद्वारे दिनांक ०१.१०.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.

ज्या संस्था प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अद्ययावत करणार नाहीत, तसेच संबंधित तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाद्वारे प्रमाणित करुन घेणार नाहीत, अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा.आयुक्त , राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर -
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि.०१ ऑक्टोबर, २०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

३. अध्यक्ष / सचिव / प्राचार्य, सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

४. कार्यासन अधिकारी, का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई
यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

D:\DTENS१_Backup\१६ Dec २०२३\२०२४\CET CELL\Intake Approval_Pharmacy\Circular of Pharmacy_Intake Approval_२०२४-२५.docx